SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलगता विभाग - २६०९०८९, २६०९०९०)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३
Website : www.unishivaji.in e-mail : affiliation1@unishivaji.ac.in

Estd-1962
NAAC "A" Grade


एसयु/संलग्नता/टे-३/एसडीएम/ १५४८ दि. १५/६/२०२० 15 JUN 2020

NO 1101

## परिपत्रक

प्रति,

मा.संस्थाअध्यक्ष/प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

**विषय :-** सहयोगी प्राध्यापकांच्या चेंजीस इन स्टाफ मान्यतेबाबत..
**संदर्भ :-** जा.क्रं. एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/वंगार/४५१ दि.१४.११.२०१९

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये पदोन्नतीस पात्र झालेल्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांनी चेंजिस इन स्टाफ फॉर्म मध्ये भरुन विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले होते. त्याच बरोबर काही शिक्षकांनी यापुर्वी सहयोगी प्राध्यापक पदी पदोन्नती मिळुनही चेंजिस इन स्टाफची मान्यता घेतलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत दि.१०.०२.२०२० व दि.२४.०२.२०२० झालेल्या चेंजिस इन स्टाफ समितीसमोर सदरचा विषय ठेवला असता समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरचा विषय दि.२०.०३.२०२० च्या अधिकार मंडळासमोर ठेवला असता सदरच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की,

१.सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे जे शिक्षक दि.०१.०१.२००६ पुर्वी प्रपाठक (Reader) म्हणून कार्यरत होते त्यांना दि.०१.०१.२००६ पासून सहयोगी प्राध्यापक म्हणून पदनामामध्ये बदल करुन (AGP ९०००) मध्ये वेतन निश्चिती केलेली आहे.

२.सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे ज्या शिक्षकांना निवड श्रेणीमध्ये दि.०१.०१.२००६ पुर्वी तीन वर्षे पुर्ण झालेली आहेत त्यांना दि.०१.०१.२००६ पासून सहयोगी प्राध्यापक म्हणून पदनामामध्ये बदल करुन (AGP ९०००) मध्ये वेतन निश्चिती केलेली आहे.

३.तसेच त्यानंतर ज्या शिक्षकांना (AGP ८०००) मध्ये तीन वर्षे पुर्ण झालेली आहेत त्यांन कॅस अंतर्गत नियमा मधील तरतुदींनुसार कार्यवाही केल्यानंतर व समितीने पात्र केल्यानंतर पात्र तारखेपासून त्यांना कॅस अंतर्गत पदन्नोती देऊन पदनामामध्ये सहयोगी प्राध्यापक म्हणून बदल करुन (AGP ९०००) मध्ये वेतन निश्चिती केलेली आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता या कार्यालयाने दि.१४.११.२०१९ च्या पत्राने कळविले प्रमाणे जे शिक्षक दि.०१.०१.२००६ पासून वरील अ.क्रं. १ ते ३ नुसार सहयोगी प्राध्यापक म्हणून त्यांच्या पदनामामध्ये बदल झालेनुसार कार्यरत आहेत अशा सर्वच शिक्षकांनी सहयोगी प्राध्यापक पदाची चेंजिस इन स्टाफची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच प्राध्यापक पदी पदोन्नतीसाठी अर्ज करताना सहयोगी प्राध्यापक पदाचा चेंजिस इन स्टाफ सादर करणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी. त्याच बरोबर उशिरा प्राप्त होणा-या प्रस्तावांपैकी जे शिक्षक दि.०१.०१.२००६ रोजी सहयोगी प्राध्यापक झालेले आहेत त्यांच्या प्रस्तावाबाबत विलंब दंड आकारला जाणार नाही. तथापि इतर प्रस्तांवाबाबत विद्यापीठ नियमानुसार विलंब दंडाची तरतूद पूर्वीप्रमाणेच लागू असणार आहे. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून हे परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

कळावे,

आपला विश्वासू

**उपकुलसचिव,**
संलग्नता विभाग

E:\1 AFFILIATION SECTION/Circular